459

क्रमांक : मुंमप्रविप्रा/बैठक/५६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, प्लॉट क्र. सी-१४ व १५,
वांद्रे [पूर्व], मुंबई-४०० ०५१.

दिनांक : २ सप्टेंबर, १९९१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ ऑगस्ट, १९९१ रोजी झालेल्या ५६व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे.

२. सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती.

[signature]

[श्र. वि. आसगांवकर]
सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :
शासनाचे सचिव [२]
नगर विकास विभाग
मंत्रालय.

प्रत अग्रेषित :
प्राधिकरणाचे अधिकारी

No.BMRDA/MTG/56.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Plot Nos.C-14 & C-15,
Bandra-Kurla Complex, 'E' Block,
Bandra(East), Bombay-400 051.

Date : 4th September, 1991.

The minutes of the 56th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 20th August, 1991 are enclosed.

Members are requested kindly to intimate their objections, if any.

(S. V. ASGAONKAR) 4/9/91
SECRETARY
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

INVITEE

The Secretary (II) to the Government of Maharashtra, Urban Development Department, Mantralaya.

Copy to :

Officers of B.M.R.D.A.

-.-.-.-.-.-

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ५६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : ५ ऑगस्ट, १९९१ [सोमवार]

वेळ : सकाळी ११-०० वाजता

सभास्थान : मा. नगर विकास मंत्री यांच्या कार्यालयातील समिती कक्ष, [खो. नं. ३१३], तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री. सुशीलकुमार सं. शिंदे,<br>नगर विकास मंत्री | अध्यक्ष |
| प्रो. जावेद खान,<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री. अरुणलाल गो. गुजराथी,<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. रमेश दुबे,<br>गृहनिर्माण राज्यमंत्री | सदस्य |
| श्री. दिवाकर ना. रावते<br>मुंबईचे महापौर,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. र. छो. अंकलेश्वरीया,<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्रीमती इंदूमती त्रि. पटेल,<br>नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्या |
| श्री. भगवंतराव अ. पाटील,<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. चंद्रकांत वा. गोसालिया,<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. प्रभाकर ना. धारकर,<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |
| श्री. डी. टी. जोसेफ,<br>शासनाचे सचिव [१],<br>नगर विकास विभाग | सदस्य |
| श्री. के. पद्मनाभय्या,<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका. | सदस्य |
| श्री. पी. सुब्रम्हण्यम,<br>महानगर आयुक्त. | सदस्य-सचिव |

प्रारंभी अध्यक्षांनी मुंबईचे महापौर म्हणून नियुक्त झाल्यानंतर प्रथमच बैठकीत उपस्थित राहीलेले श्री. दिवाकर ना. रावते यांचे स्वागत केले. मुंबई महानगर प्रदेशाच्या समस्यांची सखोल जाण व सार्वजनिक जीवनातील समृध्द अनुभव असलेले हे सदस्य प्राधिकरणाच्या विचारविमर्शात व निर्णयात मोलाची भर घालतील असा विश्वास अध्यक्षांनी व्यक्त केला.

प्राधिकरणाचे नवे महानगर आयुक्त व सदस्य-सचिव म्हणून श्री. पी. सुब्रम्हण्यम यांचेही अध्यक्षांनी स्वागत केले.

त्यानंतर मुंबईचे मावळते महापौर आणि प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य श्री. छगन भुजबळ यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेची नोंद घेतली.

त्यानंतर मावळते महानगर आयुक्त श्री. आर. एल. परदीप यांनी केलेल्या सेवेची गौरवपूर्ण नोंद घेणारा ठराव संमत करण्यात आला. [जोडपत्र]

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

बाब क्र. १ : प्राधिकरणाच्या मागील [५५व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र. २ : प्राधिकरणाच्या मागील [५५व्या] बैठकीच्या कार्यवृत्ता-वरील कार्यवाही.

प्राधिकरणाच्या दिनांक २२-३-१९९१ रोजी झालेल्या ५५व्या बैठकीत सूचना केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील भूपूर्व संरचनेच्या (infrastructure) विकासासाठीची पूर्वीची साठ लाखाची तरतूद एक कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यात आली [ज्यामध्ये ग्राम सुधारणा योजनाकरिता रु. १० लाख समाविष्ट आहेत.] त्या वर अध्यक्षांनी सूचना केली की, या अनुदानातून जिल्हा परिषदांकडून सुधारणेसाठी घेण्यात येणा-या रस्त्यांची यादी प्राधिकरणाच्या सदस्यांना देखील उपलब्ध करावी. ही सूचना मान्य करण्यात आली.

त्यानंतर प्राधिकरणाने कार्यवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेतली.

बाब क्र. ३ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील निवासी भूखंड क्र. आर-७ व आर-८ यांचे नियत वाटप.

चर्चेनंतर प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व

पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र. ४५५ :

"असे ठरविण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ च्या उपकलम [२] अन्वये सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा आणि यासंबंधात त्यांना देण्यात आलेल्या अन्य अधिकारांचा वापर करून प्राधिकरण हया अन्वये खालील सविस्तर अटी व शर्तीवर तसेच इतर प्रमाणित अटी व शर्तीवर मेसर्स इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांना वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील निवासी भूखंड क्र. आर-७ व आर-८ देण्याचा प्रस्ताव संमत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. भूखंड क्र. | : | आर-७ व आर-८ |
| २. चौ. मीटर्समध्ये अनुज्ञेय बांधीव क्षेत्र | : | ४२८१.३० |
| ३. सदर भूखंड देण्यात आलेल्या संघटनेचे नाव | : | मेसर्स इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. |
| ४. भाडेपट्टयाचा हप्ता | : | रु. ५,१४,८०,०००/- [रुपये पाच कोटी चौदा लक्ष ऐंशी हजार फक्त] |
| ५. भाडेपट्टयाचा कालावधी | : | ८० वर्षे [ऐंशी वर्षे] |

"पुढे असेही ठरविण्यात येत आहे की, हया संबंधात पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना या अन्वये देण्यात येत आहेत.

"पुढे असेही ठरविण्यात येत आहे की, जागा देणा-यावर जो भाडेपट्टा व भाडेपट्टा करार या संबंधात करारपत्र करण्यात येईल त्यात आवश्यक वाटल्यास फेरफार करण्याचे अधिकार या अन्वये महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

बाब क्र. ४ : बॅक-बे पुन:प्रापण योजना
ब्लॉक तीन ते सहाकरिता प्रारूप विकास आराखडा
नियोजन समितीचा अहवाल.

प्राधिकरणाने आपल्या दिनांक २२ सप्टेंबर, १९८९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. ४०२ अन्वये बॅक-बे पुन:प्रापण योजना ब्लॉक तीन ते सहा संबंधीचा प्रारूप विकास आराखडा प्रसिध्द करण्यास मान्यता दिली होती. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ खालील तरतूदीनुसार हे प्रस्ताव प्रसिध्द करून जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या महापालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका, व्यवस्थापकीय संचालक,

सिडको व महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा. यांचा समावेश असलेल्या नियोजन समितीने त्यांना प्राप्त झालेल्या सूचना व हरकती विचारात घेऊन त्यांचा अहवाल प्राधिकरणास सादर केला. नियोजन समितीने विविध दुरुस्त्यासहीत सादर केलेल्या अहवालावर प्राधिकरणाने विचारविमर्श केला व त्यामध्ये खालील बदल करून मंजूरी दिली :-

[१] भूखंड क्र. १२० वर कार्यालयीन सदनिका बांधण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आल्याचे तसेच त्या संबंधीचे कार्यादेश निर्गमित केल्याची प्राधिकरणाने नोंद घेतली. आणि त्या करीताच प्राधिकरणाने सदरहू भूखंड क्र. १२० उद्याना-करिता राखून ठेवण्याबाबतच्या नियोजन समितीच्या शिफारशीस मंजूरी न देता पूर्वी ठरविल्याप्रमाणे शासकीय निवासस्थाना-साठी सध्याच्या पुन:प्रापणाची स्थिती लक्षात घेऊन राखून ठेवण्यास मान्यता दिली.

[२] महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाची बसेस उभ्या ठेवण्याची जागा व टुरीस्ट बुकींग काऊंटरसाठी जागेची गरज लक्षात घेता नियोजन समितीने शिफारस केलेल्या भूखंड क्र. २४० व २४०अ वरील तळ मजला उपयुक्त नसल्याचे प्राधिकरणाला दिसून आले आणि म्हणून प्राधिकरणाने नियोजन समितीची ही सूचना मान्य न करता सदरहू भूखंड बहुमजली गाडीतळासाठी राखून ठेवला. पेट्रोल पंप व मोटार दुरुस्ती सुविधा त्यातून वगळण्यात आल्या. त्यामुळे ते भूखंड शासन किंवा इतर व्यक्ती/प्राधिकरण विकसीत करु शकतील. प्राधिकरणाने अशी शिफारस केली की, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळाच्या बसेस उभ्या ठेवण्यासाठी व टुरीस्ट बुकींग काऊंटरसाठी उपनगरात जागा उपलब्ध करण्यात यावी.

[३] गृह विभागाच्या शिफारशीप्रमाणे भूखंड क्र. ८७-अ वर एम विश्वेश्वरय्या रिसर्च व डेव्हलपमेंट सेंटरजवळ सध्या उभे असलेले बांधकाम शासनाच्या महसूल व वन विभागाने पोलीस स्टेशन-साठी उपलब्ध केल्याबाबतची प्राधिकरणाने नोंद घेतली. वरील कारणामुळे प्राधिकरणाने भूखंड क्र. ९७ -ई वरील ३३ केव्हीए "बेस्ट" प्रक्षेपण स्थानकांचे आरक्षण रद्द करुन ते प्रकाश पेठे मार्गाला लागून असलेल्या व बेस्ट डेपोच्या ईशान्येकडील भूखंड क्र. ८७ ब वर हलविण्याचे मान्य केले.

[४] भूखंड क्र. ११७ ते ११९ ब ला जोडून उत्तरेकडे अनधिकृतरित्या भर घालून तयार केलेल्या सुमारे २.६ हेक्टरच्या जमिनीच्या तुकडयाचा देखील समावेश करण्याबाबतची नियोजन समितीचे सदस्य असलेले महापालिका आयुक्त व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या सूचनेचा प्राधिकरणाने विचार केला. प्रस्तुत जमिनीचे पुन:प्रापण हे महाराष्ट्राच्या राज्यपालांनी बॅक-बे

...५/-

पुन:प्रापण मार्च, १९७९ च्या विद्यमानस्तरावर गोठविण्याच्या व त्यापूर्वी पुन:प्रापण केलेली जमीन सार्वजनिक उद्देशासाठी वापरण्याबाबतच्या विधानसभेमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या नंतरचे आहे हे लक्षात घेऊन प्राधिकरणाने असे सुचविले की, भर टाकलेल्या उपरोल्लेखित जमिनी बरोबरच सागरी भिंत, उद्यान, रस्ता इ. सारख्या सार्वजनिक हेतूसाठी प्राधिकरणाने तयार केलेल्या विकास आराखडयामध्ये समाविष्ट केलेल्या अतिरिक्त पुन:प्रापणाबाबतचे प्रस्ताव देखील विधानसभेच्या निदर्शनास आणावे.

प्राधिकरणाने त्यानुसार पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४५६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, राज्य शासनाने मार्च १९७९ मध्ये पुन:प्रापण गोठविण्याचा आणि पुन:प्रापण त्यावेळच्या विद्यमान स्तरावर ठेवण्याचा घेतलेला धोरणात्मक निर्णय तसेच त्या संबंधात महाराष्ट्र राज्यपालांनी ५ मार्च , १९७९ रोजी विधानसभेमध्ये दिलेल्या आश्वासनाच्या कारणे विकास आराखडयाचा भाग असलेले व प्राधिकरणाने तयार केलेले तसेच अंतीम मंजूरी दिलेले बॅक-बे पुन:प्रापण योजनेच्या ब्लॉक तीन ते सहा मधील अतिरिक्त पुन:प्रापणाचे विविध प्रस्ताव तसेच, भूखंड क्र. ११७ ते ११९ ब ला जोडून असलेल्या उत्तरेकडील भर टाकलेल्या २.६ हेक्टर जमिनीचाही समावेश करून राज्य शासनाकडे योग्य ते निर्णय घेण्यासाठी सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वर उल्लेखिलेला परिच्छेद एक मधील पुन:प्रापणाच्या प्रस्तावाबाबत शासन निर्णयाच्या अधीन राहून हे प्राधिकरण [१] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८[४] खालील शक्तींच्या अधीन राहून नियोजन समितीने या कार्यवृत्तात नमूद केलेल्या दुरुस्त्या तसेच भूखंड क्र. ११७ ते ११९ ब ला जोडून असलेल्या उत्तरेकडील २.६ हेक्टर जमिनीवरील भरावाबाबतची शिफारस क्र. १७ वगळून सादर केलेल्या अहवालास मंजूरी देत आहे. [२] तसेच बॅक-बे पुन:प्रापण योजनेच्या ब्लॉक तीन ते सहा बाबतच्या प्रारूप विकास आराखडयातील प्रस्ताव नियोजन समितीच्या शिफारस क्र. १७ वगळून अंतीम शिफारशीनुसार सुधारीत करून सदरहू अधिनियमाच्या कलम ३० नुसार राज्य शासनास सादर करण्यास मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, ठरावाच्या परिच्छेद १ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे भूखंड क्र. ११७ ते ११९ ब ला जोडून असलेल्या व भर टाकून तयार केलेल्या जमिनीवर कोणताही सुसंगत सार्वजनिक वापर ठरविण्याबाबत शासनास विनंती

करण्यासाठी या अन्वये महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.५ : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीस दिलेल्या रु.१० कोटी कर्जाचा परतफेडीचा कालावधी एक वर्षाने वाढविणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.४५७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम [१] चे पोटकलम [जी] अन्वये तसेच या संबंधात देण्यात आलेल्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन, मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीस दिलेल्या १० कोटी रुपये कर्जाच्या मुद्दल परतफेडीसाठी एक वर्षाचा विलंबावधी प्रस्तावास बाजार समितीने मुद्दल व त्यावरील वाढीव कालावधीसाठी व्याज परतफेडीसाठी नवे बँक हमीपत्र देण्याच्या शर्तीच्या अधीन राहून प्राधिकरण संमती देत आहे."

बाब क्र.६ : वांद्रे-कुर्ला समूहातील खोदाई आकारात सुधारणा करणे.

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र.४५८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम १२[१] [एल] आणि कलम २६[१] अन्वये दिलेल्या शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला समूहातील खोदाई आकारात वाणिज्यिक वापरदारांसाठी दर चौ.मीटरला ५०० रु. [पाचशे रु.फक्त] या दराने सुधारणा करण्यास संमती देत आहे. निवासी वापरदारांसाठी हा आकार दर चौ.मीटरला रु.२०० [दोनशे रुपये फक्त] असा राहील.

"आणखी असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, वांद्रे-कुर्ला समूहातील जमिनीसाठी आकाराची प्रयोज्यता ही, प्राधिकरणाच्या पूर्वीच्या स्थायी समितीने दिनांक १६-१०-१९८० रोजी झालेल्या आपल्या १७व्या बैठकीत ठराव क्र.१५१ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे राहील.

"आणखी असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना याद्वारे या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी योग्य ती कार्यवाही

करण्यास प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. ७ : उपविभागीय कारकूनाच्या पदाचे "स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक" या पदात रुपांतर...

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४५९ :

"असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय, पाटबंधारे विभाग क्र. इएसटी-१०८३/[४८०]-ए[तांत्रिक] दिनांक ३१ जानेवारी, १९८९ च्या अनुषंगाने, प्रस्तावित केल्याप्रमाणे या प्राधिकरणातील रु. ९५०-२०-११५०-दरो-२५-१५०० या वेतनश्रेणीतील उपविभागीय कारकून हे पद रु. १२००-३०-१४४०-दरो-३०-१८०० या वेतनश्रेणीतील "स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक" या पदामध्ये रुपांतरीत करण्यास प्राधिकरण याद्वारे ठरावाच्या दिनांकापासून मान्यता देत आहे."

बाब क्र. ८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १९९०-९१ सालचे वार्षिक लेखे

प्राधिकरणाने वार्षिक लेखे व त्यावरील मुख्य लेखाधिकारी यांचा अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४६०

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन १९९०-९१ सालाच्या वार्षिक लेखांना व त्यावरील मुख्य लेखाधिकारी यांचे अहवालाला प्राधिकरण आपली मान्यता देत आहे."

बाब क्र. ९ : बॅक-बे पुन:प्रापण योजनेकरिता [ब्लॉक तीन ते सहा] मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून १९९०-९१ चा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४६१ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, [१] बॅक-बे पुन:प्रापण योजनेतील ब्लॉक तीन ते सहाकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १९९०-९१ सालच्या प्रारुप वार्षिक अहवालास प्राधिकरण मान्यता देत आहे, आणि [२] हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचा अधिकार महानगर आयुक्तांना देण्यात येत आहेत."

[कृ. मा. प.]

बाब क्र. १० : वांद्रे-कुर्ला समूह अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९०-९१ चा वार्षिक अहवाल.

या बाबीवरील चर्चेमध्ये खालील मुख्य मुद्दे उपस्थित करण्यात आले.

[१] जलमार्ग खोदाईचे काम गेली अनेक वर्षे कार्यान्वित होत असून देखील त्याचा पुराच्या पाण्यावर फारसा परीणाम दिसून आला नाही असे निदर्शनास आणण्यात आले. खोदाईचे किती काम करण्यात आले व किती काम शिल्लक राहीले तसेच, शिल्लक राहीलेल्या कामास किती कालावधी लागेल याची विचारणाही झाली. याबाबत असा खुलासा करण्यात आला की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने जलमार्ग खोदाईच्या कामासाठी १६ कोटी रूपये खर्च केले असून सुमारे ६६ टक्के काम अजूनही कार्यान्वित करावयाचे बाकी आहे. तसेच, काही अत्यावश्यक बाबी करण्यासाठी सुमारे ३ वर्षाचा अवधी लागणार आहे. पुढे असाही खुलासा करण्यात आला की, साल १९९१-९२ मध्ये ड्राईव्ह-इन थियेटरचा कोपरा व वैतरणा पाईप लाईन ब्रीज व धारावी ब्रीज यामध्ये खोदाई करताना दिसून आलेला खडक तसेच, माहीम कॉजवेकडे जाणा-या मार्गामध्ये सापडलेला खडकाचा तळ दूर करण्याची कार्यवाही जागेनुरूप करण्यात येईल.

[२] एका सदस्याने असे निवेदन केले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कलानगर व वाकोला पुलाचे जंक्शनमध्ये पूर्ण रुंदीचा वांद्रा-कुर्ला जोडरस्ता बांधला असला तरी तेथे सांडपाण्याच्या गटाराची तरतूद करण्यात आलेली नाही. पुढे असेही सांगण्यात आले की, कलानगर ते गृहनिर्माण भवन यांच्या दरम्यान यावर्षी अनुभवलेल्या पुराचे पाणी हे वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याच्या बाजूने सांडपाण्यासाठी गटारे न ठेवण्याचा परिणाम असावा. त्यावर असा खुलासा करण्यात आला की, वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याच्या कलानगर येथील जंक्शनपासून सुमारे १ किलो मीटर अंतराच्या दोन्ही बाजूला गटार सांडपाण्यासाठी गटारे बांधण्यात आलेली नाहीत. ["इ" ब्लॉक-साठी स्वतंत्र यंत्रणा जारी करण्यात आलेली आहे.] तथापि, वांद्रे-कुर्ला जोडरस्त्यांच्या बाजूला पुराचे पाणी पसरल्याचे दिसून आले नाही. अशात-हेने कलानगर व गृहनिर्माण भवन येथील पुराचे पाण्याची वेगळी कारणे असू शकतील.

[३] विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, मिठी नदी-वरील पूल बांधणी हा वांद्रे-कुर्ला जोडरस्त्याचा भाग असून ती मंजूर संरचनेनुसारचकार्यान्वित करण्यात येईल. व या पूल बांधणीच्या मार्गात येणारी बांधकामे शेजारच्या जागेत हलविण्यात येतील.

१०.२ चर्चेच्या शेवटी अध्यक्षांनी अशी सूचना केली की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे व मुंबई महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी यांची एक समन्वय समिती ताबडतोब स्थापन करण्यात यावी. या समितीने वेळोवेळी

...९/-

दोन्ही संघटनांकडून कार्यान्वित होणा-या विविध कार्यांचा विचार करावा की, ज्यामध्ये अशा कार्याचा अंमलबजावणीचा आढावा देखील घेतला जाईल. ही व्यवस्था जलमार्ग खोदाई पूर्ण होईपर्यंत रहावी. या सूचनेसही मान्यता देण्यात आली.

१०.३ त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक अहवालास संमती दिली व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४६२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १३३ नुसार वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १९९०-९१ या वर्षात केलेल्या कार्याच्या अहवालास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे. सदर अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. ११ : ओशिवरा जिल्हा केंद्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९०-९१चा वार्षिक अहवाल.

भूमी संपादन करण्याच्या बाबीवर विशेषत: म्हाडाने संपादन केलेल्या जमिनीबाबत चर्चा झाली. म्हाडाने संपादन केलेल्या जमिनीबाबत कोर्टात दावा असल्यामुळे अध्यक्षांनी अशी सूचना केली की, नजिकच्या भविष्यकाळात ही जमीन विकासासाठी उपलब्ध होईल किंवा नाही हे अजमाविण्यासाठी संबंधीत पक्षकारांना चर्चेस बोलवावे. अध्यक्षांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, ही चर्चा लवकरात लवकर घडवून आणावी व त्याचा अहवाल प्राधिकरणाच्या पुढील सभेपुढे ठेवावा ही सूचना मान्य करण्यात आली.

२. त्यानंतर प्राधिकरणाने वार्षिक अहवालास संमती दिली व पुढील ठराव मंजूर केला:

ठराव क्र. ४६३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, ओशिवरा जिल्हा केंद्राकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तयार केलेल्या १९९०-९१ च्या प्रारूप अहवालाला मान्यता देत आहे आणि हा अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

[कृ. मा. प.]

बाब क्र. १२ : कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा १९९०-९१ सालचा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाने वार्षिक अहवाल संमत केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४६४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, कल्याण समूह अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन १९९०-९१ या वर्षात केलेल्या कामाचा अहवाल प्राधिकरण याद्वारे मान्य करीत आहे. आणि हा अहवाल राज्य शासनाला सादर करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना देत आहे."

बाब क्र. १३ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील निवासी जोड भूखंड क्र. आर-५ व आर-६ तसेच निवासी भूखंड क्र. आर-९ यांचे नियत वाटप

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ४६५ :

"असा ठराव करण्यात येतो की, वांद्रे-कुर्ला समूहाच्या "इ" ब्लॉकमधील निवासी जोड भूखंड क्र. आर-५ व आर-६ आणि निवासी भूखंड क्र. आर-९ हे बाब टिप्पणीच्या परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या ५ ज्यांची कार्यालये वांद्रे-कुर्ला समूहात आहेत अशा कोणत्याही संस्थांना, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [जमिनीची विल्हेवाट] नियम, १९७७ च्या नियम ४[३] प्रमाणे मात्र दर चटई क्षेत्र निर्देशांक चौ. मिटरला किंमत रु. १२०२४/-च्या पेक्षा कमी नाही व इतर प्रमाणित अटी व शर्तींना बाधा न येता देण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येतो की, भाडेपट्टयांबाबतचा करार व पट्टालेखाच्या प्रपत्रांत योग्य ते बदल करण्यासही महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा

प्राधिकरणाने विषय टिप्पणीतील प्रस्ताव मान्य केला व पुढील ठराव मंजूर केला :

...११/-

ठराव क्र. ४६६ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ११ च्या उपकलम [२] आणि त्याच अधिनियमाच्या कलम ५० खाली प्रदान केलेल्या अधिकारांन्वये तयार केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण [सेवा शर्ती] विनियम, १९७७ च्या विनियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून प्राधिकरण खालील दोन पदांच्या सुधारीत वेतनश्रेणीस दिनांक १-१-१९८६ पासून कार्योत्तर मंजूरी देत आहे.

| पद | असुधारीत वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १. सहाय्यक मुख्य लेखाधिकारी | रू. १०००-१५०० | रू. ३०००-१००-३५००-१२५-४५०० |
| २. कनिष्ठ लेखा अधिकारी | रू. ६००-११५० | रू. २०००-६०-२३००-द. रो. ७५-३२००-१००-३५००. |

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, ठराव क्र. ४२३, दिनांक ३१-३-१९९० मधील सर्व अन्य तरतुदीवरील दोन संवर्ग पदांच्या वेतनश्रेणी सुधारणेस लागू राहतील."

त्यानंतर अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----

जोडपत्र

जोडपत्र

## : ठराव :

"श्री. आर. एल. परदीप यांनी या प्राधिकरणाचे सदस्य-सचिव आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने दिनांक १८-७-१९८७ पासून दिनांक १८-७-१९९१ पर्यंत केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री. परदीप यांना त्यांचा भावी सेवा काळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

---

# MINUTES OF THE FIFTY-SIXTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 5th August, 1991 (Monday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room (Room No.313) in the Office of the Hon'ble Minister for Urban Development, 3rd Floor, Mantralaya, Bombay-400 032.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Shri Sushilkumar S. Shinde, Minister for Urban Development. | - Chairman |
| Prof. Javed Khan, Minister for Housing. | - Member |
| Shri Arunlal G. Gujarathi, Minister of State for Urban Development. | - Member |
| Shri Ramesh Dube, Minister of State for Housing. | - Member |
| Shri Diwakar N. Raote, Mayor of Bombay. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Bhagwantrao A. Patil, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Chandrakant V. Gosalia, M.L.A. | - Member |
| Shri Prabhakar N. Dharkar, M.L.C. | - Member |
| Shri K. Padmanabhaiah, Municipal Commissioner, B.M.C. | - Member |
| Shri D.T. Joseph, Secretary (I) to Government of Maharashtra, Urban Development Department. | - Member |
| Shri P. Subrahmanyam, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

At the outset, the Chairman welcomed Shri Diwakar N. Raote who was attending the Meeting of the Authority for the first time after his appointment as the Mayor of Bombay and expressed confidence that with his deep knowledge of the problems of Bombay Metropolitan Region and rich experience in public life, he would make valuable contribution to the deliberations and decisions of the Authority.

The .....

The Chairman also welcomed Shri P. Subrahmanyam new Metropolitan Commissioner and Member-Secretary of the Authority.

The Chairman next placed on record the valuable services rendered by Shri Chhagan Bhujbal the outgoing Mayor of Bombay who was ex-officio member of the Authority.

A Resolution appreciating the services rendered by Shri R.L. Pardeep the outgoing Metropolitan Commissioner was also adopted (Annexure).

The items on the Agenda were next taken-up for consideration.

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the last (55th) Meeting of the Authority.

The minutes were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the Minutes of the last (55th) Meeting of the Authority.

Referring to the report that as suggested in the 55th Meeting of the Authority held on 22.3.1991 total provision for improvement of infrastructure in outer area of B.M.R. (including Rs.10 lakhs for Village Amenities) was increased from Rs.60 lakhs to Rs.1 crore, the Chairman suggested that the list of roads to be taken-up for improvement by the Zilla Parishad under this grant should be made available to the members of the Authority. This was agreed to.

The action taken report was then noted by the Authority.

ITEM NO. 3 : Disposal of Residential Plots No.R-7 & R-8 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

After discussion, the Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.455 :

"RESOLVED TH T in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority

hereby.....

hereby approves the proposal to allot the two Residential Plot Nos.R-7 & R-8 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex to M/s. Indian Oil Corporation Ltd., on terms and conditions as detailed below and on other standard terms and conditions :

| | | |
|---|---|---|
| 1. Plot Nos. | : | R-7 and R-8 |
| 2. Permissible built-up area in Sq.Mtrs. | : | 4281.30 |
| 3. Name of the Organisation to which the plot is allotted. | : | M/s. Indian Oil Corporation Ltd. |
| 4. Lease Premium | : | Rs.5,14,80,000/- (Rupees Five Crores Fourteen Lakhs and Eighty thousand only) |
| 5. Lease Period | : | 80 (Eighty) years. |

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further necessary action in this regard.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable amendments, if necessary, in the form of Agreement to Lease and Lease Deed, to be executed with the allottee."

<u>ITEM NO. 4</u> : <u>Draft Development Plan for Backbay Reclamation Scheme (BBRS) Blocks III to VI - Report of the Planning Committee.</u>

The Authority vide its Resolution No.402 dated 22nd September, 1989 had approved the publication of the Draft Development Plan proposals for Backbay Reclamation Area comprising Blocks III to VI. As per provisions of Section 26 of the M.R. & T.P. Act, 1966 these proposals were published inviting suggestions and objections from the public. The Planning Committee appointed by the Authority consisting of the Municipal Commissioner, M.C.G.B., the Managing Director, CIDCO and the Metropolitan Commissioner, BMRDA considered the suggestions and objections received and had submitted its report for the consideration of the Authority. The Authority considered the various modifications suggested by the Planning Committee and approved them after making the following changes :

(1) Authority noted that already a budget provision was made and work order was issued for construction of staff quarters on Plot No.120. The Authority, therefore, did not approve the suggestion of the Planning Committee to earmark

the.....

the said Plot No.120 for garden and retained the earlier earmarking of Government Housing on the plot at the present level of reclamation.

(2) With regard to the M.T.D.C's requirement of space for bus parking and its tourist booking counter, the Authority felt that ground floor of the Plot No.240, 240 A which was recommended for the said purpose by the Planning Committee was not suitable. The Authority, therefore, did not approve the Planning Committee's said suggestion and instead retained the reservation of multistoried parking only without Petrol Pump & Auto Servicing facility thereon which can be developed either by Government or any other person/Authority. The Authority also recommended that the space for MTDC bus parking, booking counter etc. may be provided in Suburbs.

(3) The Authority noted that on the recommendation of the Home Department, Government in R. & F. D. has made available structure presently standing in/near M. Visveswaraya Research and Development Centre out of plot No.87 A for Police Station. In view of the above, the Authority agreed to delete earmarking Plot No.97 E for BEST-33-KVA Receiving Station and to relocate the same on Plot No.87-B on north-east boundary of existing BEST Depot abutting Prakash Pethe Marg.

(4) The Authority considered the suggestion made by Municipal Commissioner, M.C.G.B. and the Managing Director, CIDCO, both members of the Planning Committee, to incorporate the unauthorised filling admeasuring about 2.6 ha. north of and adjoining plot Nos.117 to 119 B. Noting that the filling of this land had taken place after Government assurance on the floor of the Legislative Assembly to freeze further reclamation in Back Bay Reclamation Area and to use the land already reclaimed for the public purpose only, the Authority suggested that the various proposals regarding additional reclamation incorporated in the Development Plan prepared by BMRDA for public purposes such as prominade, bypass road, garden etc. along with the filling of the land under reference be brought to the notice of the Legislative Assembly.

The Authority accordingly passed the following Resolution :

RESOLUTION NO.456 :

"RESOLVED THAT in view of a policy decision of the State Government taken in March, 1979 to freeze reclamation at the then existing level and further in view of the assurance of the Governor of Maharashtra on the floor of the Legislative Assembly on 5th March, 1979 to that effect, the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to

submit.....

submit the various proposals of additional reclamation of land in Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme prepared and finally approved by BMRDA as a part of Development Plan Proposals of that area including filling of 2.6 ha. north of and adjoining plot Nos.117 to 119 B, to the State Government with a request to take a suitable decision thereon.

"RESOLVED FURTHER THAT subject to Government decision on the proposals of reclamation as mentioned in para.1 above, Authority (i) in exercise of its powers under Section 28(iv) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 hereby approves the report submitted by the Planning Committee with the modifications as recorded in these minutes and further with the exception of recommendation No.17 regarding the user on the filling of 2.6 ha. north of adjoining plot Nos.117 to 119-B and (ii) further approves that the proposals of the draft Development Plan for Blocks III to VI of the Back Bay Reclamation Scheme be modified in accordance with the finally approved recommendations of the Planning Committee except in respect of recommendation No.17 as user and be submitted to the State Government for sanction under Section 30 of the said Act.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby also authorised to request the State Government to allocate any compatible public use to the land created by filling north of and adjoining plot Nos.117 to 119-B, while taking decision in respect of this plot as mentioned in para.1 of this Resolution."

<u>ITEM NO. 5</u> : Extension of repayment period of 1 year in respect of the loan of Rs.10 crores given to Bombay Agricultural Produce <u>Market Committee (BAPMC).</u>

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

<u>RESOLUTION NO.457</u> :

"RESOLVED THAT in exercise of the powers vested in it under clause (g) of sub section (1) of Section 12 of BMRDA Act, 1974 and all other powers enabling it in this behalf, the Authority approves the proposal to grant moratorium for repayment of principal amount of Rs.10 crores by one year subject to BAPMC furnishing a fresh Bank guarantee for

repayment of Principal and Interest thereon for the extended period."

ITEM NO. 6 : Channelisation charges in the Bandra-Kurla Complex - Revision of

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.458 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred on it under Section 12(1)(1) read with Section 26(i) of the BMRDA Act, 1974, the Authority hereby accords its approval to the revision of channelisation charges in the Bandra Kurla Complex at the rate of Rs.500/- (Rupees Five hundred only) per Sq. Mtr. in respect of commercial user and Rs.200/- (Rupees Two hundred only) per Sq. Mtr. for residential user.

"RESOLVED FURTHER THAT the applicability of the charges for the lands in BKC would be the same as has been decided by the erstwhile Standing Committee of the Authority under its Resolution No.151 in its 17th meeting held on 16.10.1980.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner, be authorised to take further suitable action for implementation of the resolution."

ITEM NO. 7 : Conversion of the post of "Sectional Karkoon" as "Civil Engineering Assistant".

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.459 :

"RESOLVED THAT in pursuance of Government Resolution, Irrigation Department No.EST-1083/(480)-A(Tantrik) dated 31st January, 1989, the Authority hereby approves that the post of Sectional Karkoon in the pay scale of Rs.950-20-1150-EB-25-1500 be converted as Civil Engineering Assistant in the pay scale of Rs.1200-30-1440-EB-30-1800 prescribed to the said post, with effect from the date of this Resolution, as proposed."

ITEM NO.8 : ....

ITEM NO. 8 : Annual Accounts of the BMRDA for the year 1990-91.

The Authority approved the Annual Accounts and report of the Chief Accounts Officer thereon and passed the following Resolution :

RESOLUTION NO.460 :

"RESOLVED THAT the Authority hereby accords its approval to the Accounts of the Authority for the year 1990-91 and to the Report of the Chief Accounts Officer thereon."

ITEM NO. 9 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Backbay Reclamation Scheme (Block III to VI) for the year 1990-91.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.461 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves, the draft report of the BMRDA as a Special Planning Authority for Blocks III to VI of Backbay Reclamation Scheme, for the year 1990-91 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.10 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Bandra-Kurla Complex Notified Area for the year 1990-91.

10.1 During the course of discussion on this Item, the following main points were raised :

(1) It was observed that even though channelisation works are being executed for the last many years, its impact on the flooding was not seen. It was enquired about the extent of work executed and the work in balance and how much time would be required to execute the balance work. It was explained that BMRDA had spent about Rs.16 crores on channelisation and that about 66 per cent work was still to be executed and critical items were likely to take 3 more years. It was also explained that during the year 1991-92 out-crop rock met within the channel during the earlier excavation at Drive-in-Theatre corner and between Vaitarna Pipe Line Bridge and Dharavi Bridge as also rock bed in the channel down stream of Mahim Causeway would be tackled as per site constraints.

(2) It .....

(2) It was stated by one of the members that even though BMRDA had constructed Bandra-Kurla Link Road (BKLR) to its full width from Kala Nagar Junction upto Vakola Bridge, storm water drains were not provided. It was further stated that flooding experienced this year at Kalanagar and near Griha Nirman Bhavan might be due to non-provision of storm water drains along BKLR. It was explained that for a length of about 1 km. on both the sides of BKLR from its junction at Kalanagar storm water drains in the form of road side masonary were not provided. (E Block is served by independent system). However, no flooding was seen by the side of BKLR in this reach. As such, there might be some other reason for flooding at Kalanagar and near Griha Nirman Bhavan.

(3) On enquiry it was confirmed that the onstruction of Bridge on Mithi River which is a part of BKLR, work would be executed as per sanctioned alignment by shifting the structures coming in the alignment to adjoining site.

10.2 While concluding the discussion, the Chairman suggested that a Co-ordination Committee of concerned officers of BMRDA and the Municipal Corporation of Greater Bombay be immediately constituted which should from time to time consider various works to be executed by both the organisations, including review of implementation of such works. This arrangement should continue till channelisation works are completed. This was agreed to.

10.3 The Annual Report was then approved and the following Resolution was passed :

RESOLUTION NO.462 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft of the Annual Report for the year 1990-91 of the BMRDA as a Special Planning Authority for Bandra Kurla Complex Notified Area, as required under Section 133 of the MR&TP Act, 1966, and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.11 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Oshiware District Centre Area for the year 1990-91.

There was discussion on acquisition of land, particularly the land acquired by MHADA. Since there was litigation about the said acquisition by MHADA, the Chairman suggested that the concerned litigants be called for

discussion.....

discussion so as to ascertain whether the land would be available for development in the near future. The Chairman also desired that this exercise should be completed soon and report thereof be placed before the next meeting of the Authority. This was agreed to.

2. The Annual Report was then approved and the following Resolution was passed :

RESOLUTION NO.463 :

"RESOLVED that the Authority hereby (i) approves the draft report of the BMRDA as the Special Planning Authority for Oshiware District Centre for the year 1990-91 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.12 : Annual Report of the BMRDA as a Special Planning Authority for Kalyan-Complex Notified Area for the year 1990-91.

The Authority approved the Annual Report and passed the following Resolution :

RESOLUTION NO.464 :

"RESOLVED THAT the Authority hereby (i) approves the draft Report of the BMRDA as the Special Planning Authority for Kalyan Complex Notified Area for the year 1990-91 and (ii) authorises the Metropolitan Commissioner to submit the same to the State Government."

ITEM NO.13 : Disposal of Residential Twin Plot No.R-5 & R-6 and Plot No.R-9 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.465 :

"RESOLVED THAT the Authority hereby authorises the Metropolitan Commissioner to dispose of Twin Plot No.R-5 & R-6 and Plot No.R-9 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex, to any of the organisations mentioned in para. 2 of the item note, who have got offices in the Bandra-Kurla Complex, in terms of Regulation No.4(iii) of the BMRDA (Disposal of Land) Regulations, 1977, with a condition that the price should not be less than

Rs.12,024/- per FSI Sq.Mtr. on standard terms and conditions.

"RESOLVED FURTHER THAT the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable amendments, if necessary in the form of Agreement to Lease and Lease Deed to be executed with the allottee."

ITEM NO.14 : Revision of pay scales of BMRDA employees.

The Authority approved the proposal contained in the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.466 :

"RESOLVED THAT in exercise of the powers conferred by sub-section (2) of Section 11 of the BMRDA Act, 1974 and Regulation 3 of the Bombay Metropolitan Region Development Authority (Conditions of Service) Regulations, 1977, framed by it under the powers conferred under Section 50 of the said Act, the Authority accords post-facto sanction for the revision of scales of pay with effect from 1.1.1986 of the following 2 posts :

| | Designation of the post | Unrevised scale | Revised scale |
|---|---|---|---|
| 1. | Assistant Chief Accounts Officer. | Rs.1000-1500 | Rs.3000-100-3500-125-4500. |
| 2. | Junior Accounts Officer. | Rs. 600-1150 | Rs.2000-60-2300-EB-75-3200-100-3500. |

"RESOLVED FURTHER THAT all other contents of Resolution No.423 dated 31st March, 1990 shall be applicable for revision of scales of pay of the above stated two categories of posts."

Meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

ffffffffffffffff

Annexure

ANNEXURE

## R E S O L U T I O N

"That the Bombay Metropolitan Region Development Authority places on record the valuable services rendered by Shri R.L. Pardeep as Metropolitan Commissioner & Member-Secretary of the Authority during the period from 18.7.1990 to 18.7.1991. The Authority wishes Shri Pardeep every success in his future assignments."

-.-.-.-.-.-.-.-